# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/08/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

### खून

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर पाणी फिल्टर प्लॉटचा मागील भाग डब्लुसीएल वाघोडा येथे दिनांक 09/08/2021 चे 11.00 वा. सुमारास आरोपी नामे– उमाशंकर रामशरण ठाकुर, वय 25 वर्ष, रा. माळेगाव याने रोशन दामोदर कमाले(मृतक), वय 28 वर्ष, रा. पहलेपार सावनेर याच्याशी असलेल्या जुन्या वादाचा राग मनात धरून, रोशन कमाले याच्या गळयात दुपट्टा अडकवुन त्याचे डोके सिमेंट पाईपवर व जमिनीवर आपटून त्याच्या गळयाला दुपट्टा आवळून त्याचा खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमोल दामोदर कमाले वय 32 वर्ष रा. वार्ड नं 17 स्मशान घाट जवळ सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. सागर कारंडे मो.नं 7722011228 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 10/10/2019 चे 10:00 वा. ते 18.00 वा. चे सुमारास आरोपी नामे– दिपक मन्नुलाल कटोते, वय 25 वर्ष, रा. माहुरझरी याने फिर्यादी यांची वय 16 वर्षीय पीडित मुलगी हिच्या अज्ञातपणाचा फायदा घेवुन तिला फुस लावुन पळवुन घेवुन गेला. तसेच आरोपीने वेळोवेळी तिचे सोबत शारीरिक संबंध प्रस्थापीत केले त्यामुळे ती आठ महिण्याची गरोदर राहिलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376 (3), 376 (2)(एन) भादंवि. सहकलम 4, 6(जे)(2)5एल,6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सविता सावळा मो.नं. 9405588712 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर